दि. 16/11/2022

प्रति,

मा. प्राचार्य,

तुळजाराम चतूरचंद कला, विज्ञान

ववाणिज्य महाविद्यालय, बारामती - ४१३१०२

महोदय,

उपरोक्त विषयान्वये, आपणांस अहवाल सादर करण्यात येतो की, शनिवार दि.२६ नोव्हेंबर, २०२२. रोजी आपल्या महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाव्दारें **"राष्ट्रीय संविधान हक्क दिन"** साजरा करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सचिन गाडेकर, प्रा. विनायक लष्कर, डॉ. प्रतिभा जावळे उपस्थित होते. तर कर्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. हनुमंत फाटक सर उपस्थितीत होते. या वेळी विद्यार्थाना डॉ. सचिन गाडेकर यांनी "भारत : लोकशाहीची जननी" या विषयावर विद्यार्थाना मार्गदर्शन केले. या व्याख्यानाचा प्रारंभ सकाळी १०:०० वा. झाला.

या वेळी डॉ. सचिन गाडेकर सर म्हणाले की, भारत हा बहुभाषिक, बहुसंस्कुतिक असा विविधतेने नटलेला देश आहे. जात, धर्म, भाषा, प्रांत, वेश-भूषा अशा अनेक विभन्नता आहे. मात्र भारत हा एकात्मता या तत्वावर उभा आहे. कारण एकात्मतेचे तत्व हे भारतीयतत्वाचा मुळ गाभा आणि सत्व आहे. त्यामुळे युरोपीय राष्ट्रवाद पेक्षा वेगळे आहे. जगातील कोणत्याही राष्ट्रा मध्ये आपल्याला एवढी विविधता दिसणार नाही. कारण त्याची बीजे आपल्याला आपल्या देशातील ज्या सुधारणावादी परंपरा आहेत. त्यांच्या समृद्ध इतिहास मध्ये सापडतात. कारण या देश मध्ये विषमतावादी परंपरेच्या विरोधातील एक मोठी परंपरा आहे. त्या परंपरेने आपल्यात भारतीयत्व रुजवल आहे. म्हणून भारत ही लोकशाहीची जननी म्हणणे अधिक उचित ठरेल. या परंपरे मध्ये महत्मा गौतम बुद्ध, भगवान महावीर, चार्वाक, बसवेश्वेर, चक्रधरस्वामी, संत ज्ञानेश्वर ते संत तुकाराम ह्या संत परपंरेने समतेची आणि मानवतेची शिकवण दिली. त्याच प्रतिबिंब हे भारतीय संविधाना मध्ये उमटलेले दिसून येते. सध्या महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांचे शत्रुत्व दाखवण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु वास्तव मात्र आपल्या पासून दडवून ठेवल जाते. सध्या संविधान धोक्यात असल्याची चर्चा होताना दिसून येते. संविधानाचे बचाव, संविधान जनजागृतीचे कार्यक्रम होताना दिसत आहे. प्रत्येक भारतीय नागरीकाचे प्रथम कर्तव्य हे संविधानाचे संरक्षण करणे आहे.

प्रा. विनायक लष्कर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मी प्रथम व अंतिमता भारतीय आहे. असे म्हटलेले आहे. त्यामुळे भारतीय संविधान हे आपल्यासाठी प्रमाण असले पाहिजे. मात्र समकालीन भारतीय परिस्थितीचा विचित्र आहे. त्यामुळे आपण विद्यार्थी म्हणून अधिक सजग असले पाहिजे. विद्यार्थ्यां मध्ये आपले

हक्का आणि अधिकार यांच्या विषयी अधिक जाणीव जागृती असली पाहिजे. या देश मध्ये वाढती असहिष्णुता, जाती, धर्मा वरून निर्माण होणारे तणाव हि चिंतेची बाबा आहे. मोठ्या प्रमाणावर विषमता वाढत आहे. त्या मध्ये सर्वात जास्त शोषण हे लहान मुले, स्त्रीया आणि गरीब घटक याचे होते. त्यामुळे विध्यार्थ्यानीची जबाबदारी अधिक वाढलेली आहे. मानवी मूल्य आणि मानवी हक्क यांची पायमल्ली होत असेल, तर आपल्याला हस्तक्षेप करता आला पाहिजे. तर आपल्या शिक्षणाला अर्थ आहे. आपण फक्त मूक समुहाचे भाग झालो. तर मात्र आपण अदखलपात्र ठरू. त्यामुळे सतत व्यवस्थेला प्रश्न विचारता आले पाहिजे.

डॉ. प्रतिभा जावळे यांनी आपल्या मनोगता मध्ये म्हणाल्या कि, भारतातील सर्व जात, धर्म, पंथ, वंश, भाषा, प्रांत आणि सांस्कृतिक विविधता आढळून येते. परंतु भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला संविधानाच्या माध्यमातून एकत्र आणले आहे. आपल्याला आपले हक्क आणि अधिकारा बरोबर कर्तव्याची सुद्धा जाणीव करून दिली आहे.

या वेळी प्रमुख पाहुण्याचा परिचय राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. हनुमंत फाटक सर यांनी करून दिला. त्यांनी अध्यक्षीय भाषणात आजच्या कार्यक्रमाची आवश्यकता विशद केली. संविधानाने भारतीय समाजाला समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, सामाजिक न्याय हि मूल्य दिली. हि सर्व मूल्य मानवतेची मूल्य आहे. त्यमुळे आज आपण सर्व एकत्र आहोत. परंतु सातत्याने संविधानावरती प्रश्नचिन्ह उपस्थिती केले जातात. हि मात्र गंभीर बाब आहे. आपल्या देशाचा राज्यकारभार हा संविधानाच्या कायद्याद्वारे चालतो. परंतु भारतीय समाज हा संविधाना बाबत काही प्रमाणता उदासीन मोठ्या दिसून येतो. त्यामुळे आजच्या कार्यक्रमाचे महत्व आहे. प्रत्येक भारतीयाने संविधान साक्षर होणे आवश्यक आहे. आपल्या उदासीन किंवा तटस्थ राहून चालणार नाही. तर विद्यार्थी म्हणून संविधानाच्या जाणीव जागृतीसाठी स्वता: हून पुएध्ये आले. पाहिजे असे आवाहन डॉ. हनुमंत फाटक सर यांनी या वेळी केले.

या कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. राजू पांडे यांनी केले. तर आभार डॉ. कैलास मांटे यांनी मांडले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर, उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप सर, डॉ. रामचंद्र सपकळ सर, उपप्रचार्य डॉ. सीमा नाईक गोसावी मॅडम, उपप्रचार्य डॉ. योगिनी मुळे मॅडम, महाविद्यालयाचे रजिस्टार श्री. अभिनंदन शहा सर यांनी मार्गदर्शन आणि सहकार्य केले.

# संविधान दिनाच्या कार्यक्रमाचे फोटो







डॉ. हनुमंत फाटक

राज्यशास्त्र विभागप्रमुख



अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

(स्वायत्त महाविद्यालय)

## राज्यशास्त्र विभाग

## *"राष्ट्रीय संविधान दिन"*







**अध्यक्ष**

**मा.डॉ. चंद्रशेखर मुरुमकर**

प्राचार्य

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

**व्याख्याते**

**मा.डॉ.नारायण राजुरवार**

राज्यशास्त्र विभाग

मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर

**संयोजक**

**मा.डॉ.हनुमंत फाटक**

राज्यशास्त्र विभागप्रमुख

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय

**शनिवार दि.२६ नोव्हेंबर,२०२२.** **स्थळ: प्रेरणा भवन** **वेळ: दु. १०:३० वा.**

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

(स्वायत्त महाविद्यालय)

---

दि. 26/11/2022

## राज्यशास्त्र विभाग

## *"राष्ट्रीय संविधान दिन"*

# नोटीस

राज्यशास्त्र विभागातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, दर वर्षी दि. २६ नोव्हेंबर हा दिवस भारतात **"राष्ट्रीय संविधान दिन"** म्हणून साजरा केला जातो. आपल्या महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाव्दारें शनिवार दि. २६ नोव्हेंबर, २०२२. रोजी **"राष्ट्रीय संविधान दिन"** साजरा करण्यात येणार आहे. या **"राष्ट्रीय संविधान दिना "** निमित्त **मा. डॉ. नारायण राजुरवार, मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर** यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. **"भारत: लोकशाहीची जननी"** या विषयावर व्याख्यान होणार आहे.

**हा कर्यक्रम राज्यशास्त्र विभागाचा असल्या मुळे व्याख्यानाला उपस्थित राहून व्याख्यान ऐकणे हा आपल्याला देण्यात येणाऱ्या Assessment चा एक भाग आहे. त्यामुळे सर्व Div च्या विद्यार्थ्यांची उपस्थिती अनिवार्य आहे. आपली हजेरी तपासली जाणार आहे. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**वेळ :- सकाळी १०:३० वा** **स्थळ :- प्रेरणा भवन सभागृह**

डॉ. हनुमंत फाटक

राज्यशास्त्र विभागप्रमुख